# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्र. : २५६०११८९/९०
फॅक्स क्र. : ०२०-२५६९७३८८
संकेतस्थळ : www.unipune.ac.in

**आरक्षण कक्ष**
गणेशखिंड, पुणे - ४११००७.
ई-मेल: arakshan_ar@unipune.ac.in

संदर्भ क्र. आरक्षण/ओ-२२/८८८

दिनांक : २०.०६.२०१४

प्रति,
मा.प्राचार्य/मा.संचालक,
पुणे विद्यापीठ संलग्नीत सर्व महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था.

विषय:- राज्यातील अकृषी विद्यापीठे / शासकीय महाविद्यालये/ संस्था / अशासकीय अनुदानित / विनाअनुदानित महाविद्यालयातील शिक्षकीय पदांच्या आरक्षणाबाबत.

संदर्भ:- १. शासन निर्णय क्रमांक २०१३/(४४७/१३) विशि-१, दि.- २२.०१.२०१४.
२. शासन शुध्दीपत्रक क्रमांक २०१३/(४४७/१३) विशि-१, दि.- ०४.०३.२०१४.
३. शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण २०१४/(५१/१४) /विशि-१, दि.- ११.०६.२०१४.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भीय शासन निर्णय क्रमांक ०१ अन्वये राज्यातील अकृषी विद्यापीठे व संलग्नित शासकीय / अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयातील शिक्षकी पदांसाठीचा विषयनिहाय आरक्षण लागू करण्याचा दिनांक २४.०४.१९९५ चा शासन निर्णय अधिक्रमित करून संबंधित संस्थेच्या सर्व महाविद्यालयातील एकाच शिक्षकीय संवर्गातील (वेतनश्रेणीत) सर्व विषयातील मंजूर पदे एकत्रित करून दिनांक १८.१०.१९९७ च्या शासन निर्णयातील तरतुदीप्रमाणे संवर्गनिहाय आरक्षणाची गणना करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. तसेच सदर शासन निर्णय दिनांक २२.०१.२०१४ पासून अंमलात राहील असे नमूद केलेले आहे. सोबत सदर शासन निर्णयाची प्रत जोडलेली आहे.

संदर्भीय क्रमांक ०२ च्या शासन शुध्दीपत्रकान्वये दिनांक २२.०१.२०१४ च्या शासन निर्णयामधील परिच्छेद क्रमांक ५(५) रद्द करून बिंदुनामावलीच्या तपासणी प्राधिकारी संदर्भात सुधारीत आदेश निर्गमीत केलेले आहेत. सोबत सदर शासन शुध्दीपत्रकाची प्रत जोडलेली आहे.

संदर्भीय क्रमांक ०३ च्या शासन परिपत्रकान्वये दिनांक २२.०१.२०१४ पुर्वी शिक्षक पदांची भरती प्रक्रीया सुरू केलेल्या पदांसाठी अनुसरावयाच्या आरक्षण कार्यपध्दतीबाबत तसेच शिक्षक समकक्ष पदांच्या स्वतंत्र बिंदुनामावली ठेवण्याबाबत आदेश निर्गमीत केलेले आहेत. सोबत सदर शासन परिपत्रकाची प्रत जोडलेली आहे.

याबाबत आपणास कळविण्यात येते की, शासन निर्णय दिनांक २२.०१.२०१४, शासन शुध्दीपत्रक दिनांक ०४.०३.२०१४ तसेच शासन परिपत्रक दिनांक ११.०६.२०१४ मधील निर्देशानुसार बिंदुनामावलीबाबत पुढील कार्यवाही करावी, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासु,
२०/६/१४
उपकुलसचिव
(आरक्षण कक्ष)

सोबत:- १. शासन निर्णय क्रमांक २०१३/(४४७/१३) विशि-१, दि.- २२.०१.२०१४.
२. शासन शुध्दीपत्रक क्रमांक २०१३/(४४७/१३) विशि-१, दि.- ०४.०३.२०१४.
३. शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण २०१४/(५१/१४) /विशि-१, दि.- ११.०६.२०१४.

G:\2014\Circulars.docx

राज्यातील अकृषी विद्यापीठे/शासकीय महाविद्यालये/संस्था अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित महाविद्यालयातील शिक्षकीय पदांच्या आरक्षणाबाबत

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः २०१३/(४४७/१३) विशि-१**

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२

तारीख: २२ जानेवारी, २०१४

वाचा —

१) **शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक:- एनजीसी- १४९४/(२९९१)विशि-४, दिनांक २४ एप्रिल, १९९५**

२) **शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:-बीसीसी- १०९७/प्र.क्र. ६३/९७/१६ ब, दिनांक १८ ऑक्टोबर, १९९७**

३) **शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक:-युएसजी- १४९५/(३१८३/विशि-४, दिनांक ८ डिसेंबर, १९९७**

प्रस्तावना —

शासकीय महाविद्यालयातील महाराष्ट्र शिक्षण सेवा गट "अ" मधील अधिव्याख्यात्यांनी महाविद्यालयामध्ये अधिव्याख्याता (सहायक प्राध्यापक) पदावर नियुक्ती करतांना विषयनिहाय आरक्षण ठेवण्याबाबत मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ, नागपूर येथे याचिका क्रमांक १००४/१९८९ दाखल केली होती. सदर याचिकेच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाने दिनांक २४.९.१९९० रोजी विषयनिहाय आरक्षण ठेवण्याबाबतचे आदेश दिले. सदर आदेशाविरुध्द मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका मा. सर्वोच्च न्यायालयाने खारिज करुन मा. उच्च न्यायलय, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे दिनांक २४.९.१९९० चे आदेश कायम केले. त्यानुसार राज्यातील अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक पदास विषयनिहाय आरक्षण लागू करण्याचे आदेश संदर्भाधीन क्रमांक १ येथील दिनांक २४ एप्रिल, १९९५ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आलेले आहेत. त्यानंतर संदर्भाधीन क्रमांक ३ येथील दिनांक ८ डिसेंबर, १९९७ च्या शासन निर्णयान्वये वरील आदेशाचा पुनरुच्चार करण्यात आलेला आहे.

२. तसेच श्री. आर. के. सभरवाल आणि इतर विरुध्द पंजाब राज्य यांच्या प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायलायाने दिलेला निर्णय व त्यानुसार केंद्र शासनाने दिनांक २ जुलै, १९९७ रोजी निर्गमित केलेले आदेश विचारात घेवून राज्यातील सेवाभरती, सामाजिक आरक्षण व त्याअनुषंगाने अंमलात आणावयाच्या बिंदु नामावली संदर्भात राज्य शासनाने संदर्भाधीन क्रमांक २ येथील दिनांक १८ ऑक्टोबर, १९९७ च्या शासन निर्णयान्वये प्रामुख्याने खालीलप्रमाणे आदेश दिले आहेत :-

१. आरक्षण हे संवर्गाच्या मंजूर पदसंख्येस (संवर्गातील एकूण पदांची संख्या विचारात घेऊन टक्केवारीनुसार) लावावे. रिक्त होणा-या जागांच्या संदर्भात लावू नये.
२. गुणवत्तेवर नियुक्त झालेल्या मागासवर्गीय कर्मचा-यांची आरक्षण पदावर गणना करण्यात येऊ नये व त्याची नियुक्ती आरक्षण बिंदूवर दर्शवू नये, त्याची गणना खुल्या प्रवर्गात करावी.

३. वर (१) येथे नमूद केल्यानुसार बिंदुनामावली ही रिक्त होणा-या पदावर आधारित नसावी. ती संवर्गाच्या संख्येवर आधारित असावी.

४. मागासवर्गीय प्रवर्गांना विहीत केलेले आरक्षण हे टक्केवारीनुसार असावे, व एकूण आरक्षण हे प्रचलित आरक्षण धोरणानुसार संवर्गाच्या ५२ टक्केपेक्षा जास्त असता कामा नये.

३. सामाजिक आरक्षणाच्या संदर्भात वर नमूद संदर्भाधीन क्रमांक १ व २ येथील अनुक्रमे दिनांक २४ एप्रिल, १९९५ व दिनांक १८ ऑक्टोंबर, १९९७ च्या शासन निर्णयातील तरतुदी हया मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेले आदेश विचारात घेवून करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे व संलग्नित शासकीय/अशासकीय अनुदानित /विनाअनुदानित महाविद्यालयातील शिक्षक पदांसाठी आरक्षणाचे धोरण राबविण्यात येत आहे.

४. तथापि, वरील विषयनिहाय आरक्षणाच्या धोरणामुळे सामाजिक आरक्षणातील सर्व मागासवर्गीय प्रवर्गांना त्याचा लाभ होत नसल्याचे व त्यामुळे शिक्षक पदास विषयनिहाय आरक्षणाच्या ऐवजी संवर्गनिहाय आरक्षण लागू करण्यात यावे, अशी मागणी विविध स्तरावरुन शासनाकडे करण्यात आली त्यामुळे यासंदर्भात सर्व समावेशक सामाजिक आरक्षण धोरण ठरविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय—**

५. वर प्रस्तावनेमध्ये नमूद केलेली वस्तुस्थिती विचारात घेता संदर्भाधीन क्र.१ येथील दिनांक २४ एप्रिल, १९९५ च्या शासन निर्णय अधिक्रमीत करुन राज्यातील अकृषी विद्यापीठे व संलग्नित शासकीय/अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयातील शिक्षक पदांसाठी खालीप्रमाणे सामाजिक आरक्षण लागू करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे :-

१. संबधित संस्थेच्या सर्व महाविद्यालयातील एकाच शिक्षकीय संवर्गातील (वेतनश्रेणीत) सर्व विषयातील मंजूर पदे एकत्रित करण्यात यावीत व त्यास दिनांक १८.१०.१९९७ च्या शासन निर्णयातील तरतुदीप्राणे संवर्गनिहाय आरक्षणाची गणना करण्यात यावी.

२. मंजूर पदांपैकी किती पदे भरण्यात आलेली आहेत. व भरण्यात आलेल्यापदांमध्ये कोणत्या विषयाची पदे, कोणत्या मागासप्रवर्गातून भरण्यात आलेली आहेत, याची यादी करावी.

३. उर्वरित रिक्त पदांमधील कोणकोणत्या मागासप्रवर्गातील, किती पदे रिक्त आहेत त्याची यादी करावी व कोणत्या विषयांची किती पदांची रिक्तता आहे याची यादी करावी.

४. उर्वरित रिक्त पदांमधील कोणत्या मागासप्रवर्गाची पदे रिक्त आहेत तसेच रिक्त पदांचा विषय विचारात घेवून कोणत्या मागासप्रवर्गासाठी कोणत्या विषयातील पात्र उमेदवार उपलब्ध होवू शकेल याबाबीचा विचार करुन, त्याप्रमाणे आरक्षण सूचवून संबधित संस्थेने बिंदुनामावली तयार करुन संबधित विद्यापीठाकडे सादर करावी.

५. विद्यापीठाने त्या बिंदुनामावलीची सखोल तपासणी करुन रिक्त पदांचे प्रवर्गनिहाय आरक्षण निश्चित करुन त्यास सामान्य प्रशासन विभाग (मागासवर्ग कक्ष), मंत्रालय, मुंबई यांच्याकडून मान्यता घ्यावी.

६. सदरचे आदेश सामान्य प्रशासन विभागाचा (मागासवर्ग कक्ष-१६ ब) यांनी दिनांक ०४ डिसेंबर, २०१३ रोजी दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

७. सदर आदेशातील तरतूदी शासनाच्या दिनांकापासून अंमलात येतील.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०१२२१६२१००८१०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vikas Thulshiram Kadam

Digitally signed by Vikas Thulshiram Kadam
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Higher & Technical Education, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Vikas Thulshiram Kadam
Date: 2014.01.22 17:49:56 +05'30'

(विकास तु. कदम)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल तथा कुलपती यांचे सचिव, राजभवन मलबार हिल, मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. सर्व अकृषि विद्यापीठांचे कुलगुरु,
५. सर्व विभागीय आयुक्त, (मा.व.क.)
६. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
७. सर्व अकृषि विद्यापीठांचे कुलसचिव,
८. सर्व विभागीय सह संचालक, उच्च शिक्षण,
९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१ महाराष्ट्र, मुंबई (५ प्रती),
१०. महालेखापाल (लेखा परिक्षा)-१ महाराष्ट्र, मुंबई (५ प्रती),
११. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, नागपूर, मुंबई (५ प्रती),
१२. महालेखापाल (लेखा परीक्षा)-२ नागपूर, मुंबई (५ प्रती),
१३. संचालक, लेखा व कोषागारे, (५ प्रती),
१४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,

१५.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,

१६.सर्व अवर सचिव / कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई,

१७.सामान्य प्रशासन विभाग,(१६ ब)

१८. विधी व न्याय विभाग,

१९.निवड नस्ती.

राज्यातील अकृषी विद्यापीठे / शासकीय महाविद्यालये / संस्था अशासकीय अनुदानित / विनाअनुदानित महाविद्यालयातील शिक्षकीय पदांच्या आरक्षणाबाबत

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

**शासन शुध्दीपत्रक क्रमांकः २०१३/(४४७/१३) विशि-१**

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२

दिनांक: ०४ मार्च, २०१४

<u>वाचा</u> —

१) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांकः- एनजीसी- १४९४/(२९९१) विशि-४, दिनांक २४ एप्रिल, १९९५

२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांकः-बीसीसी- १०९७/प्र.क्र. ६३/९७/१६ ब , दिनांक १८ ऑक्टोबर, १९९७

३) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांकः-युएसजी- १४९५/(३१८३/विशि-४, दिनांक ८ डिसेंबर, १९९७

४) **शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक: २०१३/(४४७/१३) विशि-१ दिनांक : २२ जानेवारी, २०१४**

<u>प्रस्तावना</u> —

सामाजिक आरक्षणाच्या संदर्भात वर नमूद संदर्भाधीन क्रमांक १ व २ येथील अनुक्रमे दिनांक २४ एप्रिल, १९९५ व दिनांक १८ ऑक्टोबर, १९९७ च्या शासन निर्णयातील तरतुदी हया मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेले आदेश विचारात घेवून करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे व संलग्नित शासकीय/अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित महाविद्यालयातील शिक्षक पदांसाठी आरक्षणाचे धोरण राबविण्यात येत आहे.

२. तथापि, वरील विषयनिहाय आरक्षणाच्या धोरणामुळे सामाजिक आरक्षणातील सर्व मागासवर्गीय प्रवर्गाना त्याचा लाभ होत नसल्याचे व त्यामुळे शिक्षक पदास विषयनिहाय आरक्षणाच्या ऐवजी संवर्गनिहाय आरक्षण लागू करण्यात यावे, अशी मागणी विविध स्तरावरुन शासनाकडे करण्यात आली

होती. त्यामुळे यांसदर्भात दिनांक २२/०१/२०१४ च्या शासन निर्णयान्वये शिक्षकीय पदांसाठी सर्व समावेशक सामाजिक आरक्षण धोरण ठरवून आवश्यक ते आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

३. सदर दिनांक २२/०१/२०१४ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक ५ (५) मध्ये महाविद्यालयाने सादर केलेल्या बिंदु नामावलीचे संबधित विद्यापीठाने सखोल तपासणी करुन रिक्त पदाचे प्रवर्ग निहाय आरक्षण निश्चित करुन त्यास सामान्य प्रशासन विभाग (मागासवर्ग कक्ष १६- ब), मंत्रालय, मुंबई यांच्याकडून मान्यता घ्यावी, असे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. सदर निर्णयानुसार राज्यातील प्रत्येक महाविद्यालयाने मंत्रालयातील मागासवर्गीय कक्षाकडून बिंदुनामावली तपासून घेणे आवश्यक करण्यात आले होते. तथापि, सदर प्रक्रिया महाविद्यालयांना अडचणीची, खर्चिक व कालापव्याय होणारी असल्यामुळे या तरतुदीमध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन शुध्दीपत्रक —

वर प्रस्तावनेमध्ये नमूद केलेली वस्तुस्थिती विचारात घेता, संदर्भाधीन क्रमांक ४ येथील दिनांक २२/०१/२०१४ शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक ५ (५) मधील तरतुद रद्द करुन याएवेजी पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे:-

५. "(५) उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या नियंत्रणाखालील शैक्षणिक संस्था/महाविद्यालये/विद्यापीठे यांच्या बिंदु नामावली तपासणी संदर्भात सामान्य प्रशासन विभागाच्या शासन परिपत्रक क्रमांक बीबीसी-२००९/प्र.क्र. २९१/०९/१६-ब दिनांक ५ नोव्हेंबर, २००९ च्या शासन परिपत्रकामधील तरतुदीप्रमाणे **प्रपत्र अ** मधील **तपासणी प्रधिकारी** हेच यापुढेही **तपासणी प्रधिकारी** असतील.

तथापि, संदर्भाधिन क्रमांक ४ येथील दिनांक २२/०१/२०१४ च्या शासन निर्णयानुसार शैक्षणिक संस्था/महाविद्यालये/विद्यापीठांमधील शिक्षकीय पदांच्या पुर्वीच्या आरक्षण धोरणात अमुलाग्र बदल झाला असल्याने, राज्यस्तरीय शैक्षणिक संस्थांच्या बिंदुनामावली या वरील तरतुदीप्रमाणे सामान्य प्रशासन विभाग (मागासवर्ग कक्ष १६-ब) मंत्रालय, मुंबई यांच्याकडे अंतिम तपासणीसाठी सादर करतांना त्या उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत ( बिंदुनामावली प्रमाणित करुन) सामान्य प्रशासन विभागाकडे सादर करण्यात याव्यात.

६. सदरचे आदेश सामान्य प्रशासन विभागाच्या (मागासवर्ग कक्ष, १६-ब) यांनी दिनांक २६/०२/२०१४ रोजी दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०३०४१६५२२९०००८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vikas Thulshiram Kadam

Digitally signed by Vikas Thulshiram Kadam
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Higher & Technical Education, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Vikas Thulshiram Kadam
Date: 2014.03.05 12:44:41 +05'30'

**(विकास तु. कदम)**

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा.राज्यपाल तथा कुलपती यांचे सचिव, राजभवन मलबार हिल, मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. सर्व अकृषि विद्यापीठांचे कुलगुरु,
५. सर्व अकृषि विद्यापीठांचे कुलसचिव,
६. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
७. सर्व विभागीय सह संचालक, उच्च शिक्षण,
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१ महाराष्ट्र, मुंबई (५ प्रती),
९. महालेखापाल (लेखा परिक्षा)-१ महाराष्ट्र, मुंबई (५ प्रती),
१०. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, नागपूर, मुंबई (५ प्रती),
११. महालेखापाल (लेखा परीक्षा)-२ नागपूर, मुंबई (५ प्रती),
१२. संचालक, लेखा व कोषागारे, (५ प्रती),
१३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१४. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१५. सर्व अवर सचिव / कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई,
१६. सामान्य प्रशासन विभाग,
१७. विधी व न्याय विभाग,
१८. निवड नस्ती.

दि. २२ जानेवारी, २०१४ पुर्वी शिक्षक पदांची भरती प्रक्रिया सुरु केलेल्या पदांसाठी अनुसरावयाची आरक्षण कार्यपध्दती

आरक्षण कक्ष
पुणे विद्यापीठ, पुणे - ४११ ००७
दिनांक - १९-६-१४ आवक क्र.- ११८२

महाराष्ट्र शासन,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : संकिर्ण २०१४/(५१/१४)/विशि-१,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२, दिनांक :- 11 जून, २०१४

वाचा : १) शासन निर्णय, क्र. एनजीसी-१४९४/(२९९१)/ विशि-४, दिनांक २४ एप्रिल, १९९५.
२) शासन निर्णय, क्र. २०१३/(४४७/१३) विशि-१, दिनांक २२ जानेवारी, २०१४.
३) डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे क्र.आस्था/विभाग/२०१४/७७३२, दिनांक ०३/०२/२०१४ चे पत्र.

**प्रस्तावना:-** राज्यातील अकृषि विद्यापीठे/शासकीय महाविद्यालये/संस्था/अशासकीय अनुदानित/विना अनुदानित महाविद्यालयातील शिक्षकीय पदांना संदर्भाधीन अनु.. क्र. १ येथील शासन निर्णय, क्र. एनजीसी-१४९४/(२९९१)/विशि-४, दिनांक २४ एप्रिल, १९९५ अन्वये विषयनिहाय आरक्षण लागू करण्यात आले होते. त्यानंतर संदर्भाधीन अनु. क्र. २ येथील शासन निर्णय, क्र. २०१३/(४४७/१३)विशि-१ दिनांक २२ जानेवारी, २०१४ अन्वये शिक्षकीय पदांच्या आरक्षण धोरणात सूधारणा करुन विषयनिहाय आरक्षणाऐवजी संवर्गनिहाय आरक्षण लागू करण्यात आले आहे. सदर दिनांक २२ जानेवारी, २०१४ चे आदेश शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून लागू करण्यात आलेले आहेत.

२. उक्त दिनांक २२ जानेवारी, २०१४ रोजीचा शासन निर्णय निर्गमित करण्यापुर्वी काही अकृषि विद्यपीठे / महाविद्यालयांनी तत्कालीन प्रचलित आरक्षण धोरणानुसार म्हणजे विषयनिहाय आरक्षण धोरणानुसार विहीत सक्षम प्राधिकरणाकडून बिंदू नामावली प्रमाणित करुन रिक्त पदांच्या संदर्भात जाहिरात देवून पद भरतीची प्रक्रिया सुरु केलेली होती. अशा शिक्षकीय पदांसाठी दिनांक २२ जानेवारी, २०१४ च्या पुर्वीचे आरक्षण धोरण लागू राहील, त्याबाबतचे निर्देश देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

तसेच दिनांक २२ जोनवारी, २०१४ च्या शासन निर्णयातील तरतुदीप्रमाणे आरक्षण धोरण लागू करतांना अकृषि विद्यापीठातील ग्रंथपाल, उपग्रंथपाल, सहायक ग्रंथपालय, संचालक, शारिरीक शिक्षण, उपसंचालक, शारिरीक शिक्षण, सहायक संचालक, शारिरीक शिक्षण, आणि संचालक, प्रौढ शिक्षण निरंतर व विस्तार सेवा त्याचप्रमाणे महाविद्यालयातील ग्रंथपाल, संचालक, शारिरिक शिक्षण इत्यादी शिक्षक समकक्ष या पदांचा समावेश शिक्षकीय पदांमध्ये करुन आरक्षण धोरण राबविण्यात यावे किंवा कसे, याबाबतचे निर्देश देण्याची बाब सुध्दा शासनाच्या विचाराधीन होती.

३. वर प्रस्तावनेमध्ये नमूद केलेली वस्तुस्थिती विचारात घेता, उक्त दोन्ही मुद्यांबाबत शासन खालील प्रमाणे निर्देश देत आहे :-

(i)वर नमूद संदर्भाधीन क्र. २ येथील दिनांक २२ जानेवारी, २०१४ रोजीचा शासन निर्णय निर्गमित करण्यापूर्वी ज्या अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांनी तत्कालीन प्रचलित धोरणानुसार म्हणजे विषयनिहाय आरक्षण धोरणानुसार शिक्षक पदांची विहीत सक्षम प्राधिकरणाकडून बिंदु नामावली प्रमाणित करुन, रिक्त पदांच्या संदर्भात जाहिरात देवून, पद भरतीची प्रक्रिया सुरु केलेली होती. अशा पद भरती प्रक्रियेतींल शिक्षक पदांना दिनांक २२ जानेवारी, २०१४ पुर्वीचे आरक्षण धोरण लागू राहील. त्यासाठी पुन्हा नव्याने दिनांक २२ जानेवारी, २०१४ च्या शासन निर्णयातील तरतुदीप्रमाणे बिंदुनामावली तपासण्याची आवश्यकता नाही, त्याप्रमाणे पदभरतीची पुढील कार्यवाही पूर्ण करण्यात यावी.

(ii) अकृषि विद्यापीठातील ग्रंथपाल, उपग्रंथपाल, सहायक ग्रंथपालय, संचालक, शारिरीक शिक्षण, उपसंचालक, शारिरीक शिक्षण, सहायक संचालक शारिरीक शिक्षण, आणि संचालक प्रौढ शिक्षण निरंतर व विस्तार सेवा तसेच महाविद्यालयातील ग्रंथपाल, संचालक, शारीरिक शिक्षण इत्यादी पदे ही शिक्षक समकक्ष पदे आहेत. संदर्भाधीन क्र.१ येथील दिनांक २४ एप्रिल, १९९५ च्या शासन निर्णयातील तरतुदी हया अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक पदांसाठी लागू करण्यात आल्या होत्या. त्यामध्ये शिक्षक समकक्ष पदांचा समावेश करण्यात आलेला नव्हता. दिनांक २२ जानेवारी, २०१४ चा शासन निर्णय, दिनांक २४ एप्रिल, १९९५ चा शासन निर्णय रद्द करुन निर्गमित करण्यात आलेला आहे. सदर मूळ शासन निर्णयामध्ये शिक्षक समकक्ष पदांचा समावेश नसल्यामुळे दिनांक २२ जानेवारी, २०१४ रोजीच्या शासन निर्णयामध्ये सुध्दा शिक्षक समकक्ष पदांचा समावेश करता येणार नाही. तसेच वर नमूद शिक्षक समकक्ष पदे यांचा स्वतंत्र पदनामासह स्वतंत्र संवर्ग असल्यामुळे त्यांच्या केवळ समान वेतनश्रेण्या विचारात घेवून त्यांचा समावेश शिक्षक पदांमध्ये म्हणजेच प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहायक प्राध्यापक या पदांमध्ये करण्यात येवू नये. त्यापदांची स्वतंत्र बिंदु नामावली ठेवण्यात यावी.

४. सदरचे परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग (१६-ब) च्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

५. हे शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०१४०६१११६०५१६९४०८ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

( विकास तु. कदम )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

मा. कुलगुरु, सर्व अकृषि विद्यापीठे
संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण
कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे
सामान्य प्रशासन विभाग, १६-ब
सर्व विभागीय आयुक्त (मावक)
निवड नस्ती.(विशि-१)